
# येशूप्रमाणे सैतानाचा प्रतिकार करण्यासाठी पवित्र शास्त्राचा उपयोग करा. मुलांना पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्यास शिकवा.

मुलांच्या गरजा व वयोमानानुसार योग्य कार्यक्रम निवडा.

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभु, मुलांनी तुझ्या वचनाचा उपयोग त्यांच्या पावलांकरिता दिवा म्हणून करून, तुझे आज्ञापालन करावे यासाठी कृपा करून ह्या अभ्यासाचा उपयोग करून घे.''



Ancient oil lamp



Kerosene lantern

मत्तय 4:1-11 वाचून येशूची मोहपरीक्षा हा वृत्तांत सांगण्याची तयारी करा. यावरून देवाच्या इच्छेने कसे वागायचे आणि शत्रूच्या मोहप्रसंगांना कसे उत्तर द्यायचे हे आम्हाला समजते येशू सैतानाचा प्रतिकार करतो याविषयी वाचण्यास मोठ्या मुलाला मार्गदर्शन करा किंवा आठवून सांगा.

वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा (प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिले आहे.)

- येशू का भुकेला होता? (पाहा वचन 2)
- सैतानाने येशूची कोणत्या तीन प्रकारे मोहपरीक्षा घेतली? (वचने 3, 6 व 9)
- सैतानाच्या प्रत्येक मोहपरीक्षेला येशूने कसा प्रतिसाद दिला? (त्याने शास्त्रलेखाच्या आधारे उत्तर दिले, वचने 4,7 व 10)
- येशूने शास्त्रलेख तोंडपाठ केले होते का? (होय)
- आमच्या जीवनातील मोहपरीक्षा व निर्णयांचा सामना करण्याची तयारी आम्ही कशी करावी? (आम्ही येशूच्या उदाहरणाचे अनुकरण केले पाहिजे. त्याने उपास व प्रार्थनेमध्ये वेळ व्यतीत केला आणि त्याला शास्त्रलेख ठाऊक होते. तसेच आपल्या आयुष्यभर त्याने शास्त्रलेखांचे आज्ञापालन केले.)

आजही, सैतान लोकांना भुलविण्यासाठी हेच तीन मार्ग वापरतो हे स्पष्ट करा.

- धोंड्यांच्या भाकरी करणे ही सैतानाची पहिली मोहपरीक्षा होती. आमच्या भौतिक शारीरिक गरजांची चिंता काळजी करावी असा मोह सैतान आम्हाला घालतो. येशूने शिकविले की आमच्या शारीरिक गरजांची चिंता करण्यापेक्षा देवावर विश्वास ठेवून आज्ञापालन करणे अधिक महत्वाचे आहे.
- मंदिराच्या शिरोभागावरून खाली उडी मार ही सैतानाने घेतलेली येशूची दुसरी मोहपरीक्षा होय. असे केल्याने अनेक लोक त्याच्या अद्‍भुत सामर्थ्याची वाहवा करतील. लोकांवर आमची छाप पडावी त्यांना आम्ही आवडावे किंवा त्यांनी आमच्या मागे यावे असा मोह सैतान आम्हाला घालतो. मग आम्ही करीत असलेली गोष्ट अयोग्य असली तरी सैतान असा मोह आम्हाला घालतो. शास्त्रलेख सांगते की देवच तुमच्या जीवनातील सर्वात महत्वाची व्यक्ती असणे अगत्याचे आहे आणि त्याची उपासना करण्यापासून कोणत्याही गोष्टीचे अडखळण येऊ नये.
- संपूर्ण जगावर राज्य करणे ही सैतानाची तिसरी मोहपरीक्षा होती. आम्ही आमच्या स्वत:च्या स्वार्थी हेतूंसाठी सामर्थ्य व अधिकाराचा वापर करावा असा मोह सैतान आम्हाला घालतो. देवाने वा इतर लोकांनी

आमची सेवा करावी असा प्रयत्न करण्यापेक्षा आम्ही देवाची सेवा करणे अगत्याचे आहे, असे शास्त्रलेख आम्हाला शिकवितात.

**स्पष्ट करून** सांगा की, आम्ही ख्रिस्ती लोकांनी येशूप्रमाणे देवाच्या वचनाचा आधार घेऊन ह्या मोहपरीक्षांना उत्तर दिले पाहिजे. येशूसारखेच आम्हालाही पवित्र शास्त्राचे चांगले ज्ञान असले पाहिजे, म्हणजे आम्हाला सैतानाचे हल्ले परतवून लावता येतील.

येशू सैतानाचा प्रतिकार करतो ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण करा.

- हे नाट्यीकरण सादर करता यावे यासाठी मुख्य उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
- तयारी करतांना लहान मुलांना मोठ्या मुलांनी मदत करावी.
- **येशू, भुलविणारा व निवेदक** ह्या भूमिका मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी कराव्यात. निवेदकाने वृत्तांताचा सारांश तयार करून मुलांना त्यांचे संवाद पाठ करण्यास व अभिनय करण्यास मार्गदर्शन करावे.
- **लहान मुलांनी, राजे** कागदी मुगूट घाला, व **देवदूत** कागदाचे पंख लावा किंवा पंखांप्रमाणे हात पसरा, ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदकः** मत्तय 4:1-11 मधून वृत्तांत सांगून म्हणा, ''येशूची प्रार्थना ऐका.''

**येशूः** ''हे पित्या, चाळीस दिवस मला स्वतःला तुझ्याशी बोलता आले याबद्दल मला आनंद वाटतो. मला फार भूक लागलेली आहे, परंतु तू माझ्यावर सोपविलेल्या कार्याच्या तयारीसाठी हे आवश्यकच होते.''

**भुलविणाराः** ''ऐक देवाच्या पुत्रा, तुला उपाशी रहायचे कारण नाही. देवाने तुला भाकरी देईपर्यंत वाट कशाला पहायची? ह्या धोंड्यांच्या भाकरी कर!''

**येशूः** ''नाही! आम्ही केवळ भाकरीने जगत नाही असे देव सांगतो. मला जगण्यासाठी देवाच्या वचनाची गरज आहे.''

**भुलविणाराः** येशूला वर खुर्चीवर ओढा आणि म्हणा, ''आता येथून खाली बघ. तू मंदिराच्या कंगोऱ्यावर उभा आहेस. येथून खाली उडी मार म्हणजे देवाने अभिवचन दिल्याप्रमाणे तो तुझे संरक्षण करील.''

**येशूः** ''नाही! मी देवावर दबाव आणणार नाही. मी त्याची सेवा करून तो संगेल तसे करीन, कारण देवाची परीक्षा पाहू नकोस असे पवित्र शास्त्र सांगते.''

**भुलविणाराः** राजांकडे बोट दाखवून म्हणा,'' ते राजे पाहिलेस. तुला त्या सर्वांवर राज्य करता येईल! तू फक्त इतकेच करायचे की देवाला विसरून जायचे आणि माझी सेवा करायची म्हणजे मग तू सर्वांत सामर्थ्यशाली राजा होशील!''

**राजेः** भुलविणाऱ्याच्या भोवती जमा होऊन त्याच्या समोर गुडघे टेकून बसा आणि म्हणा, ''महाराज चिरायू होवो!'' ''आम्हाला सामर्थ्य द्या!''

**येशूः** राजे जाईपर्यंत थांबा आणि मग भुलविणाऱ्याला बाजूला ढकलून देऊन म्हणा, ''अरे सैताना चालता हो! लोकांना मी आवडावे म्हणजे मग ते माझ्या मागे येतील म्हणून मी काही धार्मिक कृत्ये करीत नाही. तरी केवळ देवाचीच उपासना कर असे शास्त्रलेख सांगतात.''

**भुलविणाराः** ''मी परत येईन'' असे म्हणून निघून जा.

**देवदूतः** जाऊन येशूला जवळ घ्या आणि म्हणा, ''तुझ्या पित्याने आम्हाला तुझी सेवा करायला पाठविले आहे,''

**प्रश्नः** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर या अभ्यासाच्या आरंभी दिलेले प्रश्न ही त्यांना प्रौढांना विचारता येतील.

**कृतीः** पवित्र शास्त्रातील पुस्तकांची नावे पाठ करा. शक्य असल्यास ती नावे गुंफलेले गीत म्हणा.

हातात उंच दिवा धरून त्या प्रकाशात चालणाऱ्या व्यक्तीचे साधे चित्र काढा.

- मुलांना असेच चित्र काढायला सांगून रस्त्याच्या जवळ असणारे धोके त्यात दाखवायला सांगा (पशू, पहाड, वादळे आग).
- उपासनेच्या वेळी मुले हे चित्र मोठ्या माणसांना दाखवून मोहपरीक्षा आणि धोके असले तरी पवित्र शास्त्र आम्हाला देवाच्या वाटेने नेणारा दिवा आहे हे स्पष्ट करून सांगतील.

**चर्चा करा :** देव आपल्या वचनाचा दिव्याप्रमाणे उपयोग करून आमचे मोहपरीक्षा व सैतानापासून कसे रक्षण करतो याची इतर उदाहरणे सांगा.

- विचारा: कोणत्या शास्त्रलेखाच्या साहाय्याने तुम्हाला सैतानाला टाळता आले?

**कविता किंवा गीत:** काही मुलांना स्तोत्र 119 मधून 97,103,105,111 व 112 ही वचने म्हणायला सांगा.

मोठ्या मुलांनी मत्तय 4:4 मधील येशूच्या शब्दांवर कविता वा गीत लिहावे.

**पाठ करा** 2 तीमथ्य 2:15

**प्रार्थना:** ''हे पित्या, तुझे शब्द हा आमचा खजिना आहे. तुझ्या आत्म्याच्या द्वारे ते शब्द आमच्या मनी ठसव म्हणजे मोह परीक्षा व सैतानापासून आमचे संरक्षण होईल.''




Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net